जा.क्र.प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/९७०२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक : 26 AUG 1997

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद पुणे

विषय:- सन १९९६-९७च्या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक व्हीएलएस-१०९६/(४२)प्राशि-३ दिनांक १७-३-९७ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९६ पासून इयत्ता १ ली ते सन १९९६-९७च्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह प्रत्येकी एक तुकडीस प्राथमिक शाळा सुरू करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर पुणे | म.आ.मं. चे प्राथमिक विद्यालय तरवडेवस्ती ता. हवेली | इ. १ ली ते ३ री प्रत्येकी एक तुकडी | मराठी |

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

२.३ शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वियेत केले पाहिजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वियत ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

जावक क्रमांक ७२९
तारीख 30/8/97

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाची, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिका-याकडे [ परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहिल. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करून घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८. तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतिवर शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १. करिता

प्रत :- प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका
शिक्षण मंडळ, —————— जिल्हा —————— यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. सचिव.
महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर पुणे
यांना माहितीसाठी अग्रेषित.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा. क्रं. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/तुकडी-
मान्यता/७/ ९९३ /९९
पुणे- दिनांक - 31 .८. १९९९

BOOK-POST

प्रति,

मुख्याध्यापक,
महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे
प्राथ. विद्यामंदीर तरवडे वस्ती महंमद वाडी.
ता. हवेली पुणे.

विषय:- मान्यता प्राप्त विना अनुदानित खाजगी प्राथ. शाळांना नैसर्गिक वाढीच्या वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्रं. प्रा/प्राशि/खाप्राशा-जा. जु. /पी. आर. -३३२० दि. १६. ३. ९९

उपरोक्त विषय व संदर्भानुसार खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नांवासमोर दर्शविणेत आलेल्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास जादा तुकडीस जून १९९८ पासून विना -अनुदान तत्वावर मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्रं. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी<br>नै. वाढ | मंजूर<br>नामंजूर |
|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्राथ. विद्यामंदीर तरवडे वस्ती महंमद वाडी. | मराठी | इ.४थीची | १ली तु. | मंजूर. |

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, पुणे.

क्र/९९

आवक क्रमांक - १५९/०३

२५२०६/०८

कायम विनाअनुदान तत्वावर

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्रांशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक - 7 OCT 2003

प्रति,

शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पुणे.

विषय : **खाजगी कायम अनुदानित प्राथमिक शाळांना सन २००१-०२ यावर्षी इ. १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वर्ग वाढीचे/अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत. . .**

संदर्भ : **शालेय शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. व्हीएलएस-१००३/(८५६/०३)/प्राशि-३, दिनांक ६ सप्टेंबर, २००३**

सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात उपरोक्त विषयाबाबतचे प्राप्त झालेल्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळांना अतिरिक्त/नैसर्गिक वाढीच्या वर्गांना **कायम विनाअनुदान तत्वावर** मंजूरी मिळालेली आहे, त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधिन राहून वर्गांना मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्राथमिक विद्यालय, महंमदवाडी, ता. हवेली, जि. पुणे | मराठी | **मनपा** | **१ ली** | **दुसरी तिसरी** | **जून २००१** |
| | | | | **२ री** | **दुसरी तिसरी** | **जून २००२** |
| | | | | **३ री** | **दुसरी तिसरी** | **जून २००३** |

१. अतिरिक्त/नैसर्गिक वाढीच्या वर्गांचे वाटप करतांना शासन निर्णय दिनांक २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या अतिरिक्त नैसर्गिक वाढीच्या वर्गाची गरज आहे. याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यांत याव्यात.

तसेच ज्या अतिरिक्त/नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी दिली आहे, त्या शाळांकडून **कायम विनाअनुदान तत्वावर** तुकडी चालवावयास तयार आहे, असे हमीपत्र घेतल्यानंतरच संबंधित तुकडीस मंजूरी द्यावी.

मुळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मुख्याध्यापक,
महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्राथमिक विद्यालय, महंमदवाडी, ता. हवेली, जि. पुणे.

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

आवक क्र. : ४७४
दिनांक : २०/२/१३

**शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे म.न.पा.**
**जुना तोफखाना, शिवाजीनगर,**
**पुणे ४११ ००५**
**जा.क्रं .खाप्राशा/** ४३८५
११/२/१३

**शाळाप्रमुख,**
महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित,
डॉ दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिर,
तरवडेवस्ती, हवेली, पुणे ४११ ०६०.

**विषय -** विना-अनुदान तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक व अतिरिक्त तुकडी मंजूरीबाबत.

**संदर्भ -** १) शासन पत्र क्र.प्राशातु १११२/(२८६/२०१२ )प्राशि ३ दि.०८.१०.२०१२
२) मा.शिक्षण संचालक प्राथमिक शि.सं.म.रा.पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा/नै.वाढ/२०१०-२०११/ड-५१२(अ)/७२६४ दि.२२.१०.२०१२.
३) मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र .जा.क्र.शिउसं/प्राशि २/खाप्राशा-मान्यता/पुवि/१०८२-८६/२०१२ दि.१८ जानेवारी २०१३.
४) आपलेकडील जा.क्र..९५२ दि. ०५.०२.२०१३ चा प्रस्ताव

संदर्भाकित शासन पत्रानूसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना **विनाअनुदानित तत्वावर** खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंज़ूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी | ४ थी | २ री व ३ री अतिरिक्त तुकडी | २००५-०६ |

**अटी व शर्ती -**

१. शासनाच्या त्या त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे अनुदान देय राहील.
२. मूल्यांकनानूसार पात्र झाल्यानंतर या तुकडयांना शासनाच्या त्या त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे या तुकडयांना अनुदान देय राहील.
३.अनुदान मंजूर होणे हा संस्थेचा हक्क राहणार नाही. अनुदानाच्या उपलब्धतेनूसार अनुदान देण्यात येईल.
४ मान्यता दिलेल्या उपरोक्त वर्ग/तुकडयांची किमान विद्यार्थी पटसंख्या/हजेरीसंख्या टिकविण्यात यावी.
५. पटसंख्या अथवा हजेरीसंख्या कमी असल्यास तो वर्ग/तुकडी अनुदानासाठी पात्र ठरणार नाही.

११-२-१३
शिक्षणप्रमुख ,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे
# डॉ. दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिर
तरवडेवस्ती, महंमदवाडी हडपसर, पुणे ६०. ☎ : ७७४४९०६००९
● e-mail : dr.dadagujar123@gmail.com ● Udise Code - 2725 1700309 ●

शाळा मान्यता क्र.
व्ही.एल.एस्.१०९६/९२ प्रा.शि.




मा. शिक्षणाधिकारी
जिल्हा परिषद, पुणे
(प्राथमिक विभाग)

हमीपत्र

डॉ. दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिरातील ~~उपसंचालक~~ नैसर्गिक तुकड्या वाढीचे आदेश पत्र याची मूळ प्रत आमच्याकडे नाही तरी त्याची झेरॉक्स प्रत Attested करून आपणास सादर करीत आहोत. हीच नैसर्गिक तुकड्या वाढीचे आदेश प्रत्र याची खरी प्रत आहे. असे मी मुख्याध्यापिका श्रीमती. झरेकर स्वाती अंबरनाथ हमीपत्र देत आहे.

आपली विश्वासू
Zarekar

मुख्याध्यापिका
डॉ. दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिर
तरवडेवस्ती, महंमदवाडी, हडपसर, पुणे-६०

शिक्षण संचालनालय
(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
१७ OCT 2012
आवक क्रमांक:
शाखा:

मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढ/अतिरिक्त वर्ग /तुकडया मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक : प्राशातु-१११२/(२८६/२०१२)/प्राशि-३,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ ऑक्टोबर, २०१२.

वाचा :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:पीआरई १०९३/(२२१/प्राशि-१, दि. ३० जाने. १९९६,
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:पीआरई १०९३/(२९१)/प्राशि-१, दि. २२ जून,२०००,
(३) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.:व्हिएलएस-१००३/(५११/०३)/प्राशि-३,दि. १८.६ २००३,
(४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.:प्राशान्या १६०५/(३४८/०५)/प्राशि-३,दि. ८.७.२००५,
(५) बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, २००९, अंतर्गत शासन अधिसूचना क्रमांक पीआरई-२०१०/ प्र.क्र.२१२(बी)/पीई-१, दिनांक ११ ऑक्टोबर, २०११,
(६) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र, क्रमांक:खाशाप्रा/नैसर्गिकवाढ/२०१०-२०११/ड-५१२(अ), दिनांक २० जून, २०१२,
(७) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र, क्रमांक:खाशाप्रा-२०१२/नै. वाढ/२०१२/५१६४/५१६५, ड- ५१२ (१), दिनांक १९ जुलै, २०१२, व दिनांक १८ जुलै, २०१२.

**प्रस्तावना :-** राज्यातबालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, (Right of Children to Free and Compulsory Education, ACT 2009 -No. 35, 2009), लागू झाला आहे. त्यानुसार खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीने व विद्यार्थ्यांच्या पटसंख्यानुरुप अतिरिक्त तुकडया मंजूर करणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांनी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेमार्फत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** राज्यातील अनुदानित / विना अनुदानित / कायम अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांच्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) नैसर्गिक वाढीने तसेच नैसर्गिक वाढीने अतिरिक्त वर्ग तुकडयांना खालील अटींच्या अधीन राहून विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

**(अ) विभाग निहाय मंजूर वर्ग/तुकडी संख्या :- पुणे विभाग-२२, नाशिक विभाग-३१, मुंबई विभाग-१२, औरंगाबाद विभाग-४१, अमरावती विभाग-१५, नागपूर विभाग-१२, कोल्हापूर विभाग-०३ व लातूर विभाग-०३, एकूण १४७ वर्ग/तुकडया.**

(१) शासनाच्या त्या-त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे या तुकडयांना अनुदान देय राहील.
(२) मुल्यांकनानुसार पात्र झाल्यानंतरच या तुकडयांना शासनाच्या त्या-त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे या तुकडयांना अनुदान देय राहील.
(३) अनुदान मंजूर होणे हा संस्थेचा हक्क राहणार नाही. अनुदानाच्या उपलब्धतेनुसारच अनुदान देण्यात येईल.
(४) मान्यता दिलेल्या उपरोक्त वर्ग / तुकडयांची किमान विद्यार्थी पटसंख्या व हजेरीसंख्या टिकविण्यात यावी.
(५) सदर शासन निर्णय शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी संबंधितांना तात्काळ कळविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( आ. भ. जगताप )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

मुख्याध्यापिका
डॉ. दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिर
तरवडेवस्ती, महमदवाडी, पुणे-६०

प्रति,
(१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
(२) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, लातूर, कोल्हापूर व नागपूर,
(३) शिक्षण अधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हा परिषदा,
(४) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई, (५) निवड नस्ती प्राशि-३.

| नाशिक विभाग : नैसर्गिक वाढ वर्ग | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | डॉ बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था मालेगांव, जि. नाशिक संचलीत ल.की.निकम प्राथमिक विद्यामंदीर दाभाडी, ता. मालेगांव जि. नाशिक | मराठी | इयत्ता ५ वी, (प्रथम) | २०१०-११ पासून | विना अनुदान तत्वावर |
| १५ | पॅराडाईज प्राथमिक शाळा, स.नं.१०, इमाम अहमद रजा रोड, मालेगांव, जिल्हा नाशिक | उर्दू | इ.६वी व इ. ७ वी (तिसरी) | २००९ पासून इ.६वी व पुढे नैसर्गिक वाढीने | विना अनुदान तत्वावर |
| १६ | लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत आठवले जोशी बालविकास मंदीर, पोंकार कॉलनी, मेरी, नाशिक | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | २०१०-११ पासून | विना अनुदान तत्वावर |
| १७ | टिम ट्रस्ट संच. खाजगी प्राथमिक शाळा, चोरविहिर, ता. नवापूर, जि. नंदूरबार | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | २००५-०६ पासून | विना अनुदान तत्वावर |
| १८ | श्री गजानन महाराज एज्यूकेशन संस्था (चैतन्य प्राथमिक शाळा) नंदूरबार संचलीत पंडीत दिनदयाल प्राथमिक शाळा, नंदूरबार | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | २००९-१० पासून | विना अनुदान तत्वावर |
| १९ | नवसमाज विद्याप्रसारक संस्था मालेगांव कॅम्प संचलीत बाल विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | २०११-१२ पासून | विना अनुदान तत्वावर |
| २० | सद्‌गुरु शिक्षण प्रसारक मंडळ संच. प्राथमिक कन्या शाळा विद्यामंदीर, गणेश कॉलनी, चोपडा, जि. जळगाव | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | २०११-१२ पासून | विना अनुदान तत्वावर |
| २१ | युवा विकास फाऊंडेशन जळगांव संचलीत प्राथमिक विद्यामंदीर, निमखेडी शिवार | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | २०११-१२ पासून | विना अनुदान तत्वावर |
| २२ | सिटीजन वेलफेअर एज्यु. सोसा. संच.सरदार प्रायमरी स्कुल, मालेगांव जिल्हा नाशिक | मराठी | इयत्ता ६ वी (पाचवी) व इयत्ता ७ वी (चौथी) व (पाचवी) | २००४-०५ पासून इ.६वी व २००५-०६ पासून इ.७ वी. | विना अनुदान तत्वावर |
| २३ | श्री.विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, धरणगांव संचलित बालकवी ठोबरे प्राथमिक शाळा, धरणगांव जि.जळगांव | मराठी | इ. ५ वी ते ७ वी (चौथी) | सन-२०१०पासून इ.५ वी पुढे नैसर्गिक वाढीने | विना अनुदान तत्वावर |
| २४ | साक्री तालूका एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ.बाबासाहेबर आंबेडकर विद्यालय, साक्री जि.धुळे | मराठी | इयत्ता ४ थी (तिसरी) | सन २००७ पासून | विना अनुदान तत्वावर |
| २५ | कै.श्रीमंत सौ माणिकराजे शिवराव पवार विश्वासराव एज्युकेशन ॲण्ड हिस्टा ट्रस्ट नगरदेवळा प्राथ.विद्यामंदीर,कोंडवाडा गल्ली पाचोरा जि.जळगांव | मराठी | इयत्ता ५ वी (प्रथम) | सन २०१२-१३ पासून | विना अनुदान तत्वावर |
| २६ | शिव प्रतिष्ठान संचलित सरस्वती विद्यामंदीर ता.रावेर जि.जळगांव | मराठी | इयत्ता ५ वी (दुसरी) | सन २०१०-११ पासुन | विना अनुदान तत्वावर |
| २७ | पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित पंकज विद्यालय चोपडा जि.जळगांव | मराठी | इयत्ता ५ वी ते ७ वी (दुसरी) | २०१० पासून इ. ५वीं व पुढे नैसर्गिक वाढीने | विना अनुदान तत्वावर |